Title of Programme: **वाचन प्रेरणा दिन**

Name of Organizing Department : **मराठी विभाग**

Name of the Coordinator of the Programme: **डॉ. संजय शिंदे**

Date of the Programme : १५/१०/२०२६

Venue: **हुतात्मा राजगुरू महाविद्यालय राजगुरुनगर**

Target Group: **द्वितीय वर्ष कला शाखा**

Number of Participants: ४०

Name of Resource Person: **- संस्था मानद सचिव मा. नानासाहेब टाकळकर**

Total Expenditure for the Programme: - ----

Source of Funding: - ----

**Report: वाचन प्रेरणा दिन अहवाल**

खेड तालुका शिक्षण प्रसाराम मंडळाचे हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने दि. १५/१०/२०२६ रोजी माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त बचन प्रेरणा दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, वाचनसंस्कृतीला प्रोत्साहन देणे आणि पुस्तकांविषयी विचारांची देवाणघेवाण घडवून आणणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे मानद सचिव नानासाहेब टाकळकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, एमबीएचे संचालक डॉ. अरविंद शेलार, पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. गोपाळ आलापूरे, उपप्राचार्य व मराठी विभागप्रमुख डॉ. संजय शिंदे, ग्रंथपाल डॉ. पूनम तापकीर आणि डॉ. प्रतिमा लोणारी उपस्थित होते.

कार्यक्रमात मार्गदर्शन करताना नानासाहेब टाकळकर यांनी, "समृद्ध व्यक्तिमत्त्वासाठी वाचन आवश्यक आहे," असे प्रतिपादन केले. वाचनामुळे व्यक्तीची विचारशक्ती, कल्पनाशक्ती आणि अभिव्यक्ती विकसित होते. वाचन ही व्यक्तिमत्त्व विकासाची आणि जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टी देणारी प्रक्रिया असल्याचे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना नियमित वाचन करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी केले, तर आभार डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मानले.

डॉ. संजय शिंदे
मराठी विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे.

डॉ. शिरीष पिंगळे
प्राचार्य
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे.

HRM

कार्यक्रमाचे छायाचित्रे




डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला अभिवादन करताना मान्यवर व विद्यार्थी




डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला अभिवादन करताना मान्यवर व विद्यार्थी




वाचन प्रेरणा दिनानिमित्त मार्गदर्शन करताना मा. नानासाहेब टाकळकर

HRM

पुण्य नगरी

# समृद्ध व्यक्तिमत्त्वासाठी वाचन आवश्यक : नानासाहेब टाकळकर

## राजगुरू महाविद्यालयात 'वाचन संवाद' उपक्रम



**राजगुरुनगर : प्रतिनिधी**

वाचनामुळे विचार, कल्पनाशक्ती आणि अभिव्यक्ती विकसित होते. त्यामुळे समृद्ध व्यक्तिमत्त्वासाठी वाचन आवश्यक आहे, असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे मानद सचिव नानासाहेब टाकळकर यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त आयोजित वाचन दिन कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, एमबीए संचालक डॉ. अरविंद शेलार, प्राचार्य डॉ. गोपाळ आलापूरे, उपप्राचार्य व डॉ. संजय शिंदे, ग्रंथपाल पूनम तापकीर, डॉ. प्रतिमा लोणारी उपस्थित होते.

डॉ. कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन नानासाहेब टाकळकर यांच्या हस्ते करण्यात आले.

उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी 'वाचनाचे जीवनातील महत्त्व', डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी 'पुस्तके माणसाला घडवितात', तर प्रा. वैभवी कोपर्डे यांनी 'पुस्तकांचे जीवनातील स्थान' या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या निमित्ताने मराठी विभागाच्या वतीने 'वाचन संवाद' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या मुक्त मनोगतांचा आणि पुस्तकांविषयीच्या अनुभवांचा संवादात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी वाचलेल्या आणि मनाला भावलेल्या पुस्तकांविषयी मोकळेपणाने विचार व्यक्त केले. पुस्तकांमधून मिळालेले अनुभव, प्रेरणा, जीवनमूल्ये आणि विचार यांविषयी विद्यार्थ्यांनी आपली मते मांडली. प्रिया भालसिंगे, अर्पिता बुरुड, तनुप्रिया जैद, सिमरन कोळेकर, सृष्टी रगडे, सुदर्शन टाकळकर, पवन पारधी, प्रतीक लोहकरे आणि अजय चौधरी या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ग्रंथालय विभागाच्या वतीने पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी केले, तर आभार डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मानले.

18/10/2026 | Page No: 2 | Sub | Pimpri Chinchwad
epaper.punyanagari.in
Powered by - ePaperwale | 9702476117